




॥ श्री ॥

# श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था - सावरसई (पेण)

नोंदणी क्र.: सार्व. विश्वस्त व्यवस्था-एफ् ३३२१ (मुंबई) महाराष्ट्र राज्य १२६/१९७४

मौजे सावरसई, पेण-खोपोली रोड, पो.सावरसई, ता. पेण, जि. रायगड ४०२१०७.


## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (केवळ सभासदांसाठी)

श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था सावरसई (पेण) या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी (श्री रामदास नवमी वार्षिकोत्सव) दुपारी ०३.०० वाजता देवस्थानच्या सावरसई-पेण येथील "भक्तनिवास" येथे घेण्यांत येणार आहे.

### • सभेपुढील विषय आणि कामे •

१) संस्थेच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेसमोर वाचून त्यास मान्यता देणे.

२) संस्थेच्या वार्षिक कामाचा तसेच, श्रीं चा वार्षिकोत्सव जमा-खर्चा चा आढावा घेणे.

३) संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंद आणि जमा-खर्च पत्रके, आर्थिक पत्रके इत्यादींस मान्यता देणे.

४) श्रीं चे गडावरील तळ्याकडील बांधकामासाठी ग्रामपंचायत सावरसई यांचे कडे पत्र-व्यवहार करणे.

५) मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेसमोर येणाऱ्या आयत्या वेळेचे कामकाजांचा विचार करणे.

कृपया, सर्व सभासदांनी सभेसाठी वेळेवर उपस्थित रहावे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा ही नम्र विनंती.

श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था-सावरसई (पेण) करिता
मे.विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ यांचे परवानगीने आणि निर्देशानुसार

ठिकाण : सावरसई (पेण)
शनिवार दिनांक १ फेब्रुवारी २०२५

(प्रदीपचंद्र विनायक श्रृंगारपुरे)
(प्रमुख कार्यवाह)

---

### • महत्वाच्या सुचना •

१. शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी बोलावण्यांत आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब अथवा स्थगित करण्यांत आल्यास, ही सभा पुन्हा अर्धा तासानी त्याच जागी आणि त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. अश्या घेण्यांत येणाऱ्या सभेसाठी गणसंख्येची (कोरमची) आवश्यकता असणार नाही.

२. वरील प्रमाणे सभेपुढील विषय आणि कामे-क्रमांक ०३ नुसार संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंद आणि जमा-खर्च पत्रके, इत्यादीच्या प्रती संस्थेच्या कार्यालयामधील (भक्तनिवास) असणाऱ्या नोटीस बोर्डावर (सुचनाफलक) प्रसिध्द करणेंत आल्या आहेत. तसेच, संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंद आणि जमा-खर्च प्रत्रके, इत्यादीच्या प्रती यांच्या प्रती संस्थेच्या कार्यालयात पहाणेसाठी उपलब्ध आहेत.

३. संस्थेच्या मान्यवर सभासदांस सभेचे कामकाजामध्ये काही प्रश्न विचारायचे असल्यास किंवा काही सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी अश्या सूचना लेखी स्वरुपांत सभेच्या तारखेच्या सहा दिवस अगोदर म्हणजेच शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ०५.३० पर्यंत संस्थेच्या कार्यालयात मिळतील. अश्याबेताने पाठवाव्यात.

४. शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना/नोटीस संस्थेच्या कार्यालयातील (भक्तनिवास) सुचना फलकावर प्रसिध्द करण्यांत आली आहे.


Created with cam scan